# अनुदानाच्या रकमेतून मनपा शाळांमध्ये उद्याने विकसित करा - आयुक्त

**नांदेड, दि. ४ :** मनपा शाळेला देखभाल दुरूस्ती व शाळा अनुदानापोटी मिळणाऱ्या रकमेतून शाळेच्या आवारात उद्यान विकसित करण्याकडे मुख्याध्यापकांनी लक्ष द्यावे. तसेच आगामी ४ थी व ७ वीच्या शिष्यवृत्ती परिक्षेला मनपा शाळेचे १०० टक्के विद्यार्थी परिक्षेला बसले पाहिजे, या दृष्टीने तयारी करा, अशी सूचना मनपा आयुक्त डॉ. निपुण विनायक यांनी काल मनपा शाळांच्या मुख्याध्यापकांच्या बैठकीत केली.

सलग आठ तास मॅरेथॉन बैठक झाल्यानंतरही आयुक्तांचा कामाचा वेग कमी झाला नव्हता. या बैठकीनंतर त्यांनी लगेच शिक्षण विभागाच्या बैठकीत मुख्याध्यापकांना सूचना केल्या. मनपाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्याची कल्पकता शिक्षकांमध्ये असली पाहिजे, पुढच्या वर्षी खाजगी शाळांचे विद्यार्थी मनपाच्या शाळेत दाखल होण्यासाठी शिफारसी घेऊन दारात उभे राहिले पाहिजेत, इतकी सक्षम शिक्षणव्यवस्था मनपाच्या शिक्षकांनी उपलब्ध करावी. यापुढे आपण प्रत्येक शाळेला भेटी देऊ, विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमातील प्रश्न विचारू आणि गुणवत्ता घटल्यास संबंधित शिक्षक व मुख्याध्यापकांविरूद्ध कारवाई करू, अशी तंबीही आयुक्तांनी या बैठकीत दिली.

विद्यार्थ्यांच्या चाचणीप्रमाणे आता शिक्षक व मुख्याध्यापकांचीही गुणवत्ता चाचणी घेण्याची आवश्यकता असून यात कमी गुण मिळविणाऱ्या शिक्षक, मुख्याध्यापकांना 'डेंजर झोन'मध्ये टाकले जाईल आणि कमी होणाऱ्या गुणवत्तेला जबाबदार धरून पुढची कारवाई केली जाईल, असे आयुक्तांनी सांगितले.

मनपाने शाळांना ३० लाखांचा निधी पुरविला आहे. त्याकरीता शाळांनी व्यवस्थापन समितीच्या मार्गदर्शनाखाली पायाभूत सुविधांना प्राधान्य द्यावे. एकच शाळेला देखभाल दुरूस्तीसाठी ७ हजार तर शाळा अनुदानापोटी ५ ते ७ हजार मिळतात. ज्या बाबी सर्वशिक्षा अभियानातून खर्च करणे शक्य आहेत, अशा बाबींसाठी अनुदानाची रक्कम न वापरता ही रक्कम शाळांच्या परिसरात उद्यान विकसित करण्यासाठी खर्च करावी जेणेकरून विद्यार्थी शाळेत केवळ अभ्यासच करणार नाहीत तर खेळण्या-बागडण्यासाठीही आपली शाळा आहे, अशी भावना त्यांच्यात निर्माण होईल. येत्या बालदिनापर्यंत (१४ नोव्हेंबर) अशी उद्याने तयार करावीत. त्यात विशेषत: विद्यार्थिनींना खेळण्यासाठी आवश्यक असलेल्या साधनांना प्राधान्य द्यावे. तालुकांशी संपर्क साधून समन्वय वाढवावा व शालेय उपक्रमात त्यांना सहभागी करून घ्यावे. शाळांमध्ये कल्पकतेचे प्रयोग केले जावे आणि त्यावर आई, वडीलांचाही प्रतिसाद मागवावा, अशीही सूचना आयुक्तांनी केली. याप्रसंगी मनपाचे शिक्षणाधिकारी जोशी, सौ. लाठकर उपस्थित होते.